This Question Paper consists of **37** questions and **7** printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण **37** प्रश्न आणि **7** छापील पाने आहेत.

Roll No.
अनुक्रमांक

# MARATHI
## (मराठी)
## (204)

**Code No.** **64/S/O/M**
**कोड नं.**

**SET** **A**

Day and Date of Examination ………………………………………………………………
(परीक्षेचा दिवस आणि तारीख)

Signature of Invigilators 1. ……………………………………
(निरीक्षकाची सही)

2. ……………………………………

**सामान्य अनुदेश :**

1. परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.
2. कृपाकरून प्रश्न-पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रुपात असावी.
3. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर-पुस्तिकांमधे योग्य उत्तर लिहायचे आहे.
4. बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.
5. उत्तर-पत्रिकेत ओळख निर्दर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहिल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.
6. आपल्या उत्तर-पत्रिकांवर प्रश्न-पत्रिकेचा कोड संख्या **64/S/O/M,** Set A लिहावेत.

# MARATHI

## (मराठी)

## (204)

**वेळ : तीन तास ]** **[ एकूण गुण : 100**

**निर्देश :** (1) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) **सर्व** प्रश्न लक्षपूर्वक वाचून मगच प्रश्नाचे उत्तरे द्यावे.

(3) प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

1. भगिनींनी _______ व्हावे म्हणजे गावाचे गोकुळ होईल. **1**

(A) देवदेवता (B) ग्रामदेवता

(C) विश्वदेवता (D) समाजसेवक

2. धरी धरोन _______। समजोन करावें । **1**

(A) महत्कार्य (B) कीर्ती

(C) तलवार (D) कार्यभाग

3. घरावर मांजर बसले आहे. या वाक्यात वर हे _______ आहे. **1**

(A) नाम (B) क्रियापद

(C) शब्दयोगीअव्यय (D) सर्वनाम

4. दिलाप धारुरकर यांनी लिहिलेल्या पाठाचे नाव लिहा. **1**

(A) कन्याकुमारी (B) मातृशक्तीचे महत्त्व

(C) कापणी (D) पर्वतशिखर

5. बलसागर भारत होवो या कवितेचे कवी कोण ? **1**

(A) त्र्यंबक बापूजी ठोमरे (B) पांडुरंग सदाशिव साने

(C) विष्णू वामन शिरवाडकर (D) ग.दि. माडगूळकर

6. त्राण न राहाणे या वाक्प्रचाराचा अर्थ _______ **1**

(A) शक्ती न राहाणे (B) उसंत न मिळणे

(C) संयम न राहाणे (D) इच्छा न राहाणे

7. गणितीय ज्ञान किंवा गणिताचा श्वास म्हणजे _______ **1**

(A) टी. तोताद्री अय्यंगार (B) श्रीनिवासन

(C) अब्दुल कलाम (D) आर्यभट्ट

8. पसायदान म्हणजे काय ? **1**

(A) गीतेचा अर्थ (B) अभंग रचना

(C) प्रसादाचे दान (D) परमभक्ती

9. पुढील पर्यायातील निर्दोष शब्द ओळखा. **1**

(A) दूंदुभी (B) दुंदुभी

(C) दुंदुंभि (D) दूंदूभी

10. लक्ष्मीने ती सुई _______ चिमटीत पकडली. **1**

(A) बोटांच्या (B) डोळ्यांच्या

(C) दातांच्या (D) पापणीच्या

11. तळ्यातील इतर बदके 'त्या' बदकाला काय म्हणत असत ? **1**

(A) भित्रे (B) रडे

(C) वेडे (D) बावळट

12. खालील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

भारतात आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चरितार्थासाठी हायकोर्टात वकिली केली. बहिष्कृत भारत हे वर्तमानपत्र चालविले. लोकहितवादींची शतपत्रे व आगरकरांचे लेख वाचले. त्यांनी आपल्या आयुष्यात बुद्ध, कबीर व महात्मा फुले यांना गुरु मानले. डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्थेविरुद्ध कायम संघर्ष केला. त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे दलितांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. देशात प्रथमच उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाला आव्हान देणारी शक्ती निर्माण झाली.

(1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणते वर्तमानपत्र चालविले ? 1

(2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कशाचे वाचन केले ? 1

(3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणाला गुरु मानले ? 1

(4) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षाचे फलित काय ? 1

13. खालील काव्यांश वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आपल्या शब्दांत लिहा.

जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ।।१।।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।।२।।
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जानांचे चित्त ।।३।।
ज्यासि अपंगिता नाही । त्यासि धरी जो ह्रदयी ।।४।।
दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।।५।।
तुका म्हणे सांगू किती । त्याचि भगवंताच्या मूर्ति ।।६।।

(1) या अभंगाचे रचनाकार कोण ? 1

(2) खरा देव कोणास म्हणावे ? 1

(3) सज्जनांचे मन कसे असते ? 1

(4) भगवंताच्या मूर्ति कोणास म्हटले आहे ? 1

14. डोंबारी कशात कुशल असतात ? 1

15. भास्कराचार्य यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव सांगा. त्यात किती प्रकरणे होती ? 1

16. नागू आपल्या लाडक्या म्हशीला कोणत्या नावाने हाक मारीत असे ? 1

17. (अ) लक्ष्मीबाई टिळकांची व्यवहारात वागण्याची तत्वे कोणती ? 2

(ब) नागूचे एखादा पराक्रम करण्याचे स्वप्न अपुरेच का राहिले ? 2

18. (अ) भाषेच्या विकासासाठी सुशिक्षितांनी कोणती कामे केली पाहिजेत, असे टिळकांना वाटते ? 3

(ब) कन्याकुमारीच्या समुद्रकिनारी लेखकाचा कंठ का दाटून आला ? 3

19. मास्तरांनी काढून दिलेली श्री पाहून लेखकाला एकसारखे काय वाटले ? 1

20. (अ) "झेंडा घेऊन 'गांधी की जय' म्हनलं म्हंजे त्यांचं पित्त का बरं उठतं ?", या वाक्याचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. 3

(ब) महर्षी कर्वे यांच्या लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाचे कोणते विशेष लेखकाने सांगितले आहेत ? 3

21. वेलीवर उमलणारे फूल पाहून कवीला कसे वाटते ? 1

22. बोणं म्हणजे काय ? 1

23. साने गुरुजींनी कोणती आकांक्षा व्यक्त केली आहे ? 1

24. (अ) बदकाच्या उदाहरणातून कवीने मानवी स्वभावाचे कोणते विशेष सांगितले आहेत ? 2

(ब) कवी वि.दा. सावरकर कशाला पारखे झाले ? 2

25. संत एकनाथांनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव लिहा ? 1

26. (अ) एकदाच जन्मात लाभते ही असली घटिका, या पद्यपंक्तीचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. 3

(ब) पावसाच्या धारा बरसल्यावर सृष्टीतील कोणकोणती रूपे कवीला मोहित करतात ? 3

27. (अ) सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे, असे कवीने का म्हटले आहे ? 3

(ब) ईश्वराची पाऊले कधी दिसली का, या कवीच्या प्रश्नाला चांदण्या काय उत्तर देतात ? 3

28. पुढे दिलेल्या शब्दसमूहाला एक शब्द सुचवा. 1

(अ) दानधर्म करण्यात प्रसिद्ध असलेला

(ब) लहानांपासून थोरांपर्यंत

29. पुढीलपैकी कोणत्याही एका म्हणीचा अर्थ सांगून स्वत:च्या वाक्यात म्हणीचा वापर करून लिहा. **1**

(अ) इकडे आड तिकडे विहीर

(ब) नावडतीचे मीठ आळणी

30. मी बाहेर पडलो आणि पावसाला सुरुवात झाली. (या वाक्यातील उभयान्वयी अव्यय शोधून लिहा.) **1**

31. पाऊस मनासारखा झाला आहे. शेतकरी समाधानी आहेत. तेव्हा दोन शेतकऱ्यांमधला संवाद लिहा. **4**

32. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **200** शब्दांत निबंध लिहा. **10**

(1) माझे आवडते शिक्षक

(2) तानाजी मालुसरे पुन्हा अवतरले तर…

(3) प्रदूषणाच्या विळख्यात

(4) दूरचित्रवाणीचे मनोगत

33. या पाठ्यपुस्तकातील कोणता पाठ तुम्हाला सर्वात जास्त आवडला ? का ? त्या पाठाचे नाव लिहा. **4**

34. तुम्हाला तुमच्या पालकांनी नवीन मोबाईल दिला आहे. त्याची माहिती व तुम्हाला झालेला आनंद मित्राला पत्राने कळवा. **8**

**किंवा**

शाळेच्या ग्रंथालयासाठी अब्दुल कलाम यांची पुस्तके राजहंस प्रकाशन या संस्थेकडून मागविण्यासाठी त्यांना पत्र लिहा.

35. (अ) पुढील शब्दांचे प्रत्येकी **दोन** समानार्थी शब्द लिहा. **2**

(1) छंद (2) झरा

(ब) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. **2**

(1) आयात (2) कळस

(3) आस्तिक (4) ज्ञात

36. खालील उतारा वाचून स्वत:च्या भाषेत त्याचे **एक तृतीयांश** शब्दांत सारांशलेखन करा. योग्य शीर्षक लिहा. **4**

चार माणसे कुठेही थोडा वेळ जरी एकत्र जमली की, दुसऱ्याचे दोष आणि इतरांची टवाळी हा त्यांच्या बोलण्याचा मुख्य विषय असतो. म्हणजे ही एक प्रकारची परनिंदाच चाललेली असते. मद्याची नशा चढावी त्याप्रमाणे परनिंदेची धुंदी माणसाला चढत असते. स्वत:च्या अंत:करणातील आणि भोवतालच्या वातावरणातील प्रसन्नता नाहीशी करून सर्वत्र दु:खाचे, द्वेषाचे आणि औदासीन्याचे वातावरण निर्माण करण्यास हातभार लावीत असतो. धूर ओकणाऱ्या ज्योतीमुळे दिव्याची काच धुरकटून जाते. दिव्याचा प्रकाश हरपून जातो. मात्र ज्योतीची काजळी झटकली, ती मर्यादित ठेवली व दिव्यावरील काच रोज स्वच्छ पुसली की, प्रकाश अवतीभवती लख्ख पसरतो तसेच आपण पहाटे उठण्यापूर्वी किंवा रात्री झोपण्यापूर्वी मनाच्या काचेवर इतरांच्या अवगुणांच्या विचाराने जमलेली काजळी अंत:करणातील क्षमेच्या राखेने पुसली की, आपले मन दिवसभर टवटवीत राहते.

37. संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी व बारावी अशा दोन इयत्ता आहेत. या दोन्ही वर्गांच्या कला, वाणिज्य, विज्ञान अशा तीन शाखा आहेत. यावरून वृक्ष–आलेख तयार करा । **4**